कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर अंतर्गत वसतिगृहाकरीता फर्निचर खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: कोचिन-२०२६/प्र.क्र.१७६/(ई-१८०२९५४)/सां.का.१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २४ ऑगस्ट, २०२६.

वाचा : १) व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर यांचे पत्र क्र.कोचिन/२०२६/८२, दि.०५/०८/२०२६
२) व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर यांचे पत्र क्र.कोचिन/२०२६/९५, दि.१८/०८/२०२६

प्रस्तावना :

कोल्हापूर चित्रनगरीमधील चित्रिकरणासाठी पायाभूत सुविधांसाठीच्या कामाकरिता वाचा येथील प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने कोल्हापूर चित्रनगरीतील वसतिगृहाकरीता फर्निचर खरेदी करण्यासाठी रु.१,३६,४१,९२३/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

कोल्हापूर चित्रनगरीतील वसतिगृहाकरीता फर्निचर खरेदी करण्यासाठी एकूण **रु.१,३६,४१,९२३/- (अक्षरी रुपये एक कोटी छत्तीस लक्ष एकेचाळीस हजार नऊशे तेवीस फक्त)** इतक्या रकमेस या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम रुपयात)

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित किंमत
१	२	३
१	कोल्हापूर चित्रनगरीमध्ये वसतिगृहाकरीता फर्निचर खरेदी करणे.	१,१५,६०,९५२/-
	वस्तु व सेवा कर (१८%)	२०,८०,९७१/-
	एकूण	**१,३६,४१,९२३/-**

०२. सदर प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१. शासनाने भांडवली कामासाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीची गणना कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या भांडवलातील शासनाच्या सहभागात करण्यात यावी.
२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दि.०१/१२/२०१६ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासकीय

विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

३. सदरहू फर्निचरची नेमकी आवश्यकता/ मागणी याची शहानिशा/ खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. सदर प्रक्रिया उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/ उद्योग-४, दि.०१/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात यावी.

४. सदरहू फर्निचरची खरेदी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२१५/उद्योग-४, दि.२४/०८/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात यावी.

५. सदरहू फर्निचरचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याचे खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/ अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical Specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

६. प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे GEM Portal, इतर राज्यांचे दरकरार खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

७. खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व/ पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post-dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (Specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल तसेच फर्निचर दीर्घकाळ टिकणारे व देखभाल दुरुस्ती खर्च कमी असल्याची खात्री करण्यात यावी.

८. खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (Storage & Distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply Chain Management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management), मेन्टेनन्स योग्य पद्धतीने करुन, सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

९. महामंडळाला ज्या प्रयोजनार्थ निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे, त्याच प्रयोजनावर निधीचा वापर करण्यात यावा, निधीचा वापर अन्य कोणत्याही प्रयोजनार्थ करण्यात येऊ नये.

१०.शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले विहीत नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

११.महामंडळाने केलेल्या खर्चाच्या विवरणाबरोबरच उपरोक्त कामांची प्रगती व भौतिक साध्य याची तपशिलवार माहिती संचालक मंडळाला वेळोवेळी अवगत करण्यात यावी व दर तीन महिन्यांनी शासनास देखील अवगत करण्यात यावी.

१२.सदरचा निधी खर्च करण्यापूर्वी सक्षम स्तरावर मान्यता घेण्यात यावी.

०३. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र. झेडडी-०५, ४२०२-शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च, (००)(०२) कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाला भाग भांडवली अंशदान (कार्यक्रम) (४२०२ ०७८५) ५४-गुंतवणुका" या लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.

०४. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०२६/ प्र.क्र.२२/विनियम, दि.११ ऑगस्ट, २०२६, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ४ मधील परिच्छेद क्र.२७ (२) (अ) नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक. २०२६०८२४१४५१४४५४४३ असा आहे. हा आदेश डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUMANT DINKAR PASHTE

Digitally signed by SUMANT DINKAR PASHTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS, 2.5.4.20=58694D4CD2BD16F0AB6514FC8598A9AA217E2508455856A701ADB1BB6EF9B120, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AFC006DAAE95D0F2CF7C7F09CA18CF0C9C9363A05E6070B1C03455CF1CB43586, cn=SUMANT DINKAR PASHTE
Date: 2026.08.24 14:53:10 +05'30'

(सुमंत दि.पाष्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर.
४. उप सचिव, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- १, महाराष्ट्र, मुंबई
६. महालेखापाल (लेखापरीक्षा) १, महाराष्ट्र, मुंबई
७. वित्त विभाग (सा.उ./व्यय-१५/अर्थसंकल्प-११), मंत्रालय, मुंबई
८. नियोजन विभाग (का. १४४३), मंत्रालय, मुंबई
९. अवर सचिव (अर्थसंकल्प), सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.अवर सचिव (रोख शाखा), सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.निवडनस्ती (सां.का.१)